**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९६ । बुधवार २६ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# लिफ्ट देण्याच्या बहाण्याने मंगळसूत्र लुटणारी टोळी जेरबंद

## एलसीबीच्या कारवाईत आठ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** चारचाकी वाहनातून लिफ्ट देण्याच्या बहाण्याने वृद्ध महिलांना लुटणाऱ्या एका टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. या कारवाईत महिलेसह दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, मिरजगाव आणि पाथर्डी पोलीस ठाण्यातील चेन स्नॅचिंगचे दोन गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.

दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी ६५ वर्षीय तक्रारदार महिला मिरजगाव येथे जाण्यासाठी रस्त्यावर थांबलेल्या असताना, एका महिला व पुरुष आरोपीने त्यांना कारमध्ये सोडण्याच्या बहाण्याने बसवले. काही अंतरावर नेऊन जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने काढून घेतले व त्यांना गाडीतून ढकलून दिले. या प्रकरणी मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे २५ ऑगस्ट रोजी तारकपूर बसस्टॅण्ड परिसरातून आरोपी कोमल भाऊसाहेब नन्नवरे (वय ३०, रा. छत्रपती संभाजीनगर) हिला ताब्यात घेण्यात आले. तिच्या माहितीवरून अहिल्यानगर शहरातील कोंबडीवाला मळा येथे सापळा रचून तिचा साथीदार लक्ष्मण मोहन जामदार (वय २६, रा. श्रीगोंदा) याला हुंदाई औरा () कारसह ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी नागलवाडी (कर्जत) आणि पाथर्डी परिसरामध्ये वृद्ध महिलांना लिफ्ट देऊन लुटल्याची कबुली दिली. आरोपींनी लुटलेल्या दागिन्यांची विक्री करून मिळालेली रक्कम बँक खात्यात भरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी मिरजगाव पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**जप्त केलेला मुद्देमाल**

**पोलिसांनी आरोपींकडून सात लाख रुपये किमतीची विनाक्रमांकाची हुंदाई औरा कार, ९० हजार रुपये किमतीची सहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एक मोबाईल व नंबर प्लेट (-४२--८९९९) असा एकूण आठ लाख पाचशे रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**पत्रकार सुशील थोरात हल्ला प्रकरण**

# हल्लेखोर गुन्हेगारी टोळीवर बीएनएस कलम १११ दाखल

## तोफखाना पोलिसांनी उचलले कडक पाऊल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील पत्रकार सुशील थोरात व त्यांच्या मुलावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या कुख्यात गुन्हेगारी टोळीचे कंबरडे मोडत तोफखाना पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या सराईत टोळीवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे संघटित गुन्हेगारीविरोधी कडक कलम १११ समाविष्ट करण्यात आले आहे.

दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी पाईपलाईन रोड येथे गाडीच्या धडकेच्या कारणावरून आरोपींनी पत्रकार सुशील थोरात आणि त्यांचा मुलगा सार्थक यांना शिवीगाळ करत डोक्यात दगड मारून, गळा दाबून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी २४ ऑगस्ट रोजी सोनू उर्फ हेमंत दत्तात्रय कोहक, महेश उर्फ पप्पू दशरथ मते आणि प्रशांत शिवाजी निक्रड या तिघांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या टोळीवर तोफखाना व पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुनाचा प्रयत्न, फसवणूक आणि जबरी मारहाणीचे तब्बल १३ गंभीर गुन्हे आधीच दाखल आहेत.

पुन्हा पुन्हा गंभीर गुन्हे करणाऱ्या या टोळीची दहशत मोडून काढण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक बालाजी वैद्य आणि त्यांच्या पथकाने या गुन्ह्यात कलम १११ वाढवण्याचा प्रस्ताव दिला, ज्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली.

नागरिकांनी अशा गुन्हेगारांची भीती न बाळगता पुढे यावे; कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.

**एमपीएससी एफडीए परीक्षा अखेर रद्द**

# एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी करत आ. रोहित पवार आक्रमक

**पुणे –** अन्न व औषध प्रशासन () परीक्षा गैरप्रकार व पेपरफुटी प्रकरणामुळे अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने () संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. गुन्हे अन्वेषण शाखेच्या () तपास अहवालानुसार परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे व एका उमेदवाराला प्रश्नसंच मिळून त्याचा गैरलाभ घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. या निर्णयामुळे गेली अनेक दिवस लढा देणाऱ्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मोठे यश मिळाले आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन सरकार आणि एमपीएससी प्रशासनावर घणाघाती टीका केली. कमिशनर असताना वादात सापडलेल्या अधिकाऱ्याला आयोगाचे अध्यक्ष केले गेले असून, ते एका मोठ्या नेत्याचे मित्र आहेत, असा थेट आरोप त्यांनी केला.

आमदार पवार पुढे म्हणाले की, ■ पान ४ वर

# वृक्षारोपण, रक्तदान शिबीराने डॉ. दीपक यांचा ७६ वा वाढदिवस साजरा





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** साईदीप हॉस्पिटल चे चेअरमन डॉ दीपक एस एस यांचा ७६वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमानी ज्यामध्ये वृक्षारोपण, रक्तदान शिबीर आयोजित करून साजरा करण्यात आला अशी माहिती हॉस्पिटल संचालक डॉ वेंकटेश मुळे यांनी दिली.

वय वर्ष ७६ पण अजून ही तीच ऊर्जा आणि रुग्णाबद्दल ची आस्था आणि त्यांना बरे करण्याची धडपड सतत करणारे डॉ दीपक एस एस यांचा ७६ वा वाढदिवस रक्तदान शिबीर तसेच वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सौ ज्योती दीपक, डॉ किरण दिपक, डॉ वैशाली किरण, डॉ अमित बडवे, डॉ शैलेंद्र पाटणकर, डॉ ऋषिकेश कालगांवकर, डॉ सुनील दारंदले, इंजिनीर मुरलीधर बिहाणी, शरद झवर, विलास काळभोर इत्यादी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ दीपक एस एस यांनी सांगितले की शरीर जरी दमले तरी मन मात्र कार्यरत राहिले पाहिजे आणि मी हेच ब्रीद कायम ठेवून या वयात ही रुग्णसेवा करीत आहे व शेवट पर्यंत करत राहणार असे ते म्हणाले यावेळी साईदीप हॉस्पिटल मधील डॉक्टर्स, नर्सेस, व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपास्थित होते.

# 'विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणेशमूर्तीचीच घरी स्थापना करा' – महापौर ज्योतीताई गाडे

## शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती । माझी वसुंधरा अभियानांतर्गत कार्यशाळा; दहा उत्कृष्ट मूर्तींना प्रत्येकी एक हजार रुपयांचे पारितोषिक





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका व रेसिडेन्सी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली.

या कार्यशाळेत रेसिडेन्सी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मनोभावे शाडू मातीला आकार देत श्री गणेशाच्या विविध रूपांतील सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत गणेशमूर्ती बनविण्याचा आनंद घेतला.यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणपतीची स्थापना तसेच पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणारी गणेशमूर्तीची मिरवणूक याबाबत जनजागृतीपर कला सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, विद्यालयाचे प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य भाऊसाहेब पवार, पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, तुकाराम भांगरे, मूर्तिकार बालाजी बल्लाळ, पर्यवेक्षक शरद सोनवणे, वैशाली मरकड, धनंजय मस्के, भरतसिंग सारवान आदींसह विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, अहिल्यानगरकरांचा आवडता उत्सव म्हणजे गणेशोत्सव होय. विद्यार्थ्यांनी नवीन गणपतीची मूर्ती विकत न घेता आपल्या हाताने शाडू मातीला आकार देऊन

■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### साईनगरी, फुलारी मळा परिसरातील रस्त्याच्या खडीकरण कामाला सुरुवात


अहिल्यानगर- नागरदेवळे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आलमगीर रोड येथील साईनगरी व फुलारी मळा परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या अंतर्गत रस्त्याच्या खडीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. आमदार अक्षय कर्डिले यांच्या सहकार्यातून हे विकासकाम मार्गी लागले असून, या कामामुळे परिसरातील नागरिकांची अनेक दिवसांपासूनची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. या विकासकामाचे उद्घाटन सौ. प्रांजली सर्वेश सपकाळ आणि नागरदेवळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच सोनू भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, ग्रामसेवक भाऊसाहेब भाबड, ग्रामपंचायत सदस्य अजय गारदे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, महिला व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.साईनगरी व फुलारी मळा परिसरातील अंतर्गत रस्त्याची अवस्था खराब झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यावर चिखल, खड्डे आणि पाणी साचत असल्याने पादचारी, दुचाकीस्वार तसेच शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करताना त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्त्याच्या खडीकरणाचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.उपसरपंच सोनू भुजबळ यांनी सांगितले की, नागरदेवळे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे. नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यानुसार विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. गावातील प्रलंबित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, नागरिकांच्या सहकार्यामुळे विकासकामे अधिक प्रभावीपणे पूर्ण करता येत असल्याचे त्यांनी सांगितले.मुख्य रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक अधिक सुलभ होण्याबरोबरच नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. त्यामुळे अंतर्गत रस्त्याच्या खडीकरणासोबतच मुख्य रस्त्याच्या प्रस्तावित कामामुळे परिसराच्या विकासाला आणखी चालना मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. रस्त्याच्या खडीकरणाच्या कामामुळे परिसरातील महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल व खड्ड्यांमुळे ये-जा करणे कठीण होत होते. त्यामुळे दैनंदिन कामांसाठी बाहेर पडणाऱ्या महिलांसह विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता रस्त्याचे काम सुरू झाल्याने ही गैरसोय कमी होणार असल्याचे उपस्थित महिलांनी सांगितले.

### नगर तालुका तालीम सेवा संघाच्या नवीन कार्यकारिणीला धर्मादाय उपायुक्तांची मान्यता

अहिल्यानगर - नगर तालुका तालीम सेवा संघाच्या नवीन कार्यकारिणीला धर्मादाय उपायुक्तांची मान्यता मिळाली आहे. संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी धर्मादाय उपायुक्तांकडे चेंज रिपोर्ट दाखल केला होता. या चेंज रिपोर्टला मंजुरी मिळाल्याने संघाच्या नवीन कार्यकारिणीचा मार्ग मोकळा झाला असून, पै. नाना डोंगरे यांची पुन्हा पाच वर्षांसाठी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. नगर तालुका तालीम सेवा संघाची सन २०२४ मध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीची मुदत संपली होती. सदर कार्यकारिणीची मुदत पूर्ण झाल्यानंतर संघाच्या प्रशासकीय कामकाजाबाबत आवश्यक असलेला चेंज रिपोर्ट धर्मादाय उपायुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाची प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कार्यकारिणीला अधिकृत मान्यता मिळाली आहे. त्यामुळे संघाच्या आगामी कार्याला संस्थात्मक आणि कायदेशीर स्वरूपात महत्त्व प्राप्त झाले आहे.नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी प्रतिभा डोंगरे, उपाध्यक्षपदी काशीनाथ पळसकर व संदिप डोंगरे, सचिवपदी बाळू भापकर, सहसचिवपदी प्रियंका डोंगरे, खजिनदारपदी किसन वाबळे, तर विश्वस्तपदी उत्तम कांडेकर यांची निवड करण्यात आली आहे. अनुभवी पदाधिकाऱ्यांसह नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून संघाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### जयवंत खताळ यांचे दुःखद निधन

अहिल्यानगर- सावेडी पाईपलाईन रोड अष्टविनायक कॉलनी येथील रहिवासी जयवंत तात्याबा खताळ वय (७०) यांचे दिनांक २३. ८. २०२६ रोजी यांचे आकस्मित निधन झाले.नालेगाव अमरधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या मागे मुलगा मुलगी पत्नी नातवंडे पुतणे दोन भाऊ असा परिवार आहे व विशाल व वैशाली खताळ यांचे ते वडील होते.



## डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाला नागरिकांचा प्रतिसाद; डॉन बॉस्को परिसरात घरोघरी पाणीसाठे तपासणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पावसाळा सुरू झाल्यानंतर साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढते. त्यामध्ये डेंग्यूचा धोका लक्षात घेता अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून ‘डेंगूमुक्त अहिल्यानगर’ अभियान राबविण्यात येत आहे. या साप्ताहिक उपक्रमांतर्गत मनपा प्रभाग क्रमांक १ मधील डॉन बॉस्को परिसरात घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी तसेच नागरिकांमध्ये डेंग्यूबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी आठरे पाटील पब्लिक स्कूल आणि डॉन बॉस्को स्कूलच्या विद्यार्थ्यांनी डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करणारे पथनाट्य सादर करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी घर व परिसरातील पाणीसाठे नियमित तपासणे, स्वच्छता राखणे आणि डासांची उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून केले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक सागर बोरुडे, डॉ. अनिल आठरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, रोहिणी अंकुश, सुरेखा फुलपगार, सुनंदा शिरवळ, डॉ. वृषाली आरु, डॉ. शिल्पा चेलवा, डॉ. सृष्टी बनसोडे यांच्यासह विद्यार्थी, पालक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपत बारस्कर म्हणाले की, पावसाळा आला की विविध साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरत असतात. डेंग्यू हा स्वच्छ पाण्याच्या साठ्यांमुळे होणारा आजार असल्याने त्यावर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी महानगरपालिकेच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान राबविले जात आहे.

या अभियानामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली असून शहरात डेंग्यूचे रुग्ण कमी प्रमाणात आढळत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ, सुंदर व हरित ठेवण्याचे काम केल्यास अहिल्यानगर शहर निश्चितच डेंगूमुक्त होईल. महापालिकेच्या या कामाचा आदर्श राज्य पातळीवर घेतला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मनपा आरोग्य विभागाने शहरातील प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांमध्ये डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करावी, जेणेकरून चांगल्या कामाचे अनुकरण इतर ठिकाणीही केले जाईल. आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतील डेंगूमुक्त अहिल्यानगर उपक्रम कौतुकास्पद असून, या माध्यमातून नगरकरांचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहण्यास मदत होईल, असेही बारस्कर म्हणाले.

महापालिकेच्या माध्यमातून डेंग्यू आजाराबाबत ज्याप्रमाणे प्रभावीपणे काम सुरू आहे, त्याचप्रमाणे शहरातील मोकाट कुत्र्यांच्या समस्येवरही काम करावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, डासांपासून विविध साथीचे आजार पसरत असतात. डेंग्यू हा गंभीर आजार असून वेळेवर निदान व उपचार होणे गरजेचे आहे. डेंग्यू होऊ नये यासाठी महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

यामध्ये पाणीसाठ्यांची तपासणी करून ते नष्ट करणे, औषध व धूरफवारणी करणे, आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून मोफत तपासणी करणे आदी उपाययोजनांचा समावेश आहे. तसेच शहरातील विविध भागांमध्ये जाऊन आशा सेविका व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी केली जात आहे. आरोग्याच्या सुविधा नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचविण्याचे काम आरोग्य विभागाकडून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.
नगरसेवक सागर बोरुडे यांनी डेंगूमुक्त अभियानाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंग्यूबाबत जनजागृती करण्यात येत असून, आरोग्य सेविका व आशा सेविका नागरिकांच्या आरोग्यासाठी चांगले काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अनिल आठरे यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देत नगरकरांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा, असे मत व्यक्त केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शिल्पा चेलवा यांनी केले.

## ढोकेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

**विद्यार्थ्यांनी घरातील सदस्यांसमोर व्यसन सोडण्यासाठी जिद्द करावी– उज्वला दीदी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर –**समाजातील वाढते व्यसनाधीनतेचे प्रमाण लक्षात घेतले तर समाजातील सर्व घटकांनी व्यसनमुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत आणि विद्यार्थींनी पालकांसमोर मोबाईल घेऊन देण्यासाठी हट्ट करण्या ऐवजी घरातील सदस्यांना जडलेले व्यसन सोडवण्यासाठी हट्ट करावा असे प्रतिपादन प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय टाकळी ढोकेश्वर च्या उज्वला दीदींनी केले.



पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पाचवी ते बारावीच्या १४०० शाळकरी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली व व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प केला त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उज्वला दीदी बोलत होत्या.

या प्रसंगी पायमोडे दीदी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद भाई, रमण भाई, दिपक भाई, सुगंधा माताजी, बाबासाहेब जाधव, रवींद्र मते, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, निलम खिलारी, वैशाली गायखे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, सोनाली माळवदे, प्रा.अशोक गांगड, योगेश मांडगे, आतिष झावरे, देविदास आठरे, राजेंद्र ढोणे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, प्रा.दळवी, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे,सोनल पायमोडे, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.

## पैठणमध्ये ‘मोहरम’ कथासंग्रहावर चिंतनशील चर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** जिल्हा परिषद कन्या शाळा, पैठण येथे २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत डॉ. हंसराज जाधव यांच्या ‘मोहरम’ या कथासंग्रहाच्या निमित्ताने दर्जेदार चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या पैठण शाखेच्या ‘मासिक पुस्तक चर्चा’ या उपक्रमांतर्गत झालेल्या या चर्चेला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रल्हाद लुलेकर होते. त्यांनी कथासंग्रहातील आशयाचे सामाजिक व सांस्कृतिक अंगाने विश्लेषण करत महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. वक्ते डॉ. रामचंद्र काळुंखे यांनी कथांवर सूक्ष्म आणि चिकित्सक भाष्य केले, तर कवी संदीप जगदाळे यांनी आपल्या मनोगतातून कथासंग्रहाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

ही चर्चा केवळ एका पुस्तकापुरती किंवा लेखकापुरती मर्यादित न राहता, सध्याच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक तसेच व्यक्तिगत पातळीवरील बिघडलेल्या वातावरणाचे गांभीर्य अधोरेखित करणारी ठरली. या परिस्थितीत सकारात्मक पर्याय कसे शोधता येतील, यावरही सखोल चिंतन घडवून आणणारी ही चर्चा ठरली.

पैठण शाखेचा ‘मासिक पुस्तक चर्चा’ हा उपक्रम साहित्यिक आणि सामाजिक संवादाला चालना देणारा असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले असून पैठण शाखेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## वडार समाजाच्या विविध मागण्यांसाठी वीर वडार एकता फाउंडेशनचा एल्गार




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वडार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वीर वडार एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या जनसंपर्क दौरा व संघटनात्मक अभियानाचा शुभारंभ केडगाव येथील अर्चना हॉटेलमध्ये करण्यात आला. समाजाच्या विविध प्रश्नांवर राज्य सरकारकडे आवाज उठविण्यासोबतच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारून त्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे म्हणाले की, राजकीय पक्षांतील नेते आणि विविध संघटनांनी वडार समाजाला कुठे नेऊन ठेवले आहे, असा प्रश्न आजही उपस्थित होतो. समाज मूलभूत प्रश्नांपासून दूर आहे. त्यामुळे समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारकडे ठामपणे आवाज उठविण्यात येणार आहे. समाजाचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारण्यात येईल आणि त्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले जाईल.

समाजातील गोरगरीब कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी दिवाळीच्या सणादरम्यान राज्यस्तरीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचेही गोरे यांनी सांगितले. वडार समाजावर होणारा अन्याय आणि अत्याचार यापुढे खपवून घेतला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

## अहिल्यानगर जिल्हाभर ७५०० रक्तपिशव्यांचा संकल्प, युवक–महिलांचा मोठा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, या माध्यमातून अनेक रुग्णांचे प्राण वाचवण्याचे काम होत असते. रक्तदान करणाऱ्यांमध्ये समाजात असलेले गैरसमज या मेगा रक्तदान शिबिरातून दूर होण्याचे काम होईल. अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनने मोबाईलमुळे जसे माणसे जोडण्याचे काम केले, तसे रक्तदानातून माणुसकीचे नाते निर्माण केले. नंदनवन मंगल कार्यालय येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, महिलाही पुढे येऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान करताना दिसत आहेत. ही राज्यातील पहिली घटना असेल. रक्तदात्यांचे व रक्तपेढींचे अभिनंदन करतो की, या माध्यमातून अनेक रुग्णांचे जीव वाचले जातील. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन पाहायला मिळाले असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशन व काका ट्रस्ट यांच्यावतीने मेगा रक्तदान शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, उपमहापौर ॲडव्होकेट धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, विनायक देशमुख, स्थायी समितीचे सभापती पहलवान सुभाष लोंढे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अजित जगताप, नगरसेवक विकी जगताप, गोरख पडोळे, अजित पवार, अमित बुरा, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, प्राध्यापक माणिक विधाते, नगरसेवक महेश तवले, सुनील त्रिंबके, प्रकाश भागनगरे, आशिष पोखरणा, मनीष चोपडा, सुरेश बनसोडे, मयूर बांगरे, दत्ता गाडळकर, अजिंक्य बोरकर, विपुल शेट्टी, बाळासाहेब बारस्कर, योगेश ठुबे, डॉक्टर सागर बुरुडे, महेश लोंढे, डॉक्टर आशिष भंडारी, राज देशमुख, नगरसेविका सुजाता पडोळे, सोनाबाई शिंदे, सुनीता हुलसंदर, गीतांजली काळे, शितल ढोणे, अनिता शेटीया, मयुरी जाधव आदींसह रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## विकासकामांमध्ये नागरिकांच्या गरजा केंद्रस्थानी; प्रभागातील उर्वरित प्रश्नही टप्प्याटप्प्याने मार्गी लावणार – महापौर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १७ मधील अमरधाम ते भुतारे डेकोरेटर गोडाऊन तसेच गाडीलकर भट्टी (लोखंडी पुलाजवळ, मल्हारचौक) परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नगरसेवक मयूर बांगरे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आणि पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळून प्रत्यक्ष कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, ‘‘शहराचा विकास हा केवळ मोठ्या रस्त्यांपुरता किंवा प्रमुख चौकांच्या सुशोभीकरणापुरता मर्यादित नसतो. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले अंतर्गत रस्ते, पाणी, स्वच्छता, ड्रेनेज, प्रकाश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांची अनेक दिवसांपासून अंतर्गत रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत मागणी होती. पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे आणि वाहतुकीला होणारा त्रास यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन नगरसेवक मयूर बांगरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात होत आहे. या कामामुळे नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा मिळण्यास मदत होईल.’’

त्या पुढे म्हणाल्या, ‘‘अहिल्यानगर शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास करण्यासाठी नागरिक, नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील समस्या लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्या समस्यांवर उपलब्ध निधी, तांत्रिक बाबी आणि प्राधान्यक्रम लक्षात घेऊन कामे मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील. प्रभाग क्रमांक १७ मधील या रस्त्याच्या कामाप्रमाणेच परिसरातील इतर आवश्यक विकासकामांकडेही गांभीर्याने पाहिले जाईल. विकासकामांची गुणवत्ता चांगली राहावी, कामे वेळेत पूर्ण व्हावीत आणि त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना मिळावा, यासाठी आवश्यक ती दक्षता घेतली जाईल. शहराच्या विकासात नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य महत्त्वाचे असून, सर्वांच्या सहकार्याने अहिल्यानगर अधिक सुंदर, स्वच्छ आणि सुविधायुक्त करण्याचा संकल्प आहे.’’

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सनातन धर्मसभेच्यावतीने २७ ऑगस्ट रोजी श्रावणी

अहिल्यानगर - येथील सनातन धर्मसभेच्यावतीने नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने २७ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता श्रावणीचा कार्यक्रम महाजन गल्ली येथील चतुर्वेद भवन येथे धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे तसेच विक्रमादित्य देवव्रत रेखे यांच्या मंत्रघोषात होणार आहे. समाजातील सर्व बांधव पुरोहित मंडळ संस्थेचे सभासद, सदस्य यांनी आपली साहित्य घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, मंत्री दिनकरराव देशमुख, खजिनदार उमेश नगरकर, वेदमूर्ती उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी आदींनी केले आहे. गेल्या शंभर वर्षांपासून ही संस्था श्रावणीचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करते. श्रावणाच्या निमित्ताने होत असलेल्या या कार्यक्रमास समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे उपाध्यक्ष डॉक्टर नंदकुमार मुळे, मंत्री रमेश देशपांडे यांनी केले आहे.

### उडाणच्या कार्यक्रमात सामाजिक कार्याचा जागर

अहिल्यानगर - ''स्पर्धा आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखवते. स्पर्धेमुळे स्वतःमधील कौशल्य सुधारण्याची संधी मिळते. कष्टाची सवय लागते. आपल्या कामाचा दर्जा सुधारतो. स्वयंमूल्यमापन होऊन आत्मविश्वास निर्माण होतो,'' असे प्रतिपादन कुस्तीतील आंतरराष्ट्रीय खेळाडू व सुवर्णपदक विजेत्या पै. डॉ. शबनम शेख यांनी केले.माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशन संलग्न जय असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात स्वच्छता पखवाड्यानिमित्त देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा तसेच 'महाराष्ट्राची लोकधारा' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय 'उडाण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात पै. डॉ. शबनम शेख बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात तुलसी मातेला पाणी अर्पण करून करण्यात आली. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे संचालक मेहरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे राज्य अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उडाणच्या अध्यक्षा आरती शिंदे, शासनाचा राज्य आदर्श युवती पुरस्कार विजेत्या जयश्री शिंदे, ॲड. अनिता दिघे, ॲड. दिनेश शिंदे आदी उपस्थित होते.पुढे पै. डॉ. शबनम शेख म्हणाल्या की, पुरस्कारामुळे गुणवत्तेचा सन्मान होतो. केलेल्या कामाची पावती मिळाल्याने आणखी काम करण्यास ऊर्जा मिळते. इतरांनाही चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तीला स्वतःमधील कौशल्य ओळखून त्यात सुधारणा करण्याची संधी मिळते. स्पर्धेमुळे कष्टाची सवय लागते आणि आपल्या कामाचा दर्जाही सुधारतो. स्वयंमूल्यमापन होऊन आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### गणेशोत्सवापूर्वी प्लास्टिकच्या फुलांच्या विक्री-वापरावर निर्बंध घाला

अहिल्यानगर - आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात प्लास्टिक व कृत्रिम फुलांची विक्री, वापर आणि वितरण यावर लागू कायदे व शासनाच्या निर्देशांनुसार आवश्यक ती बंदी अथवा निर्बंधात्मक कार्यवाही करावी. तसेच नैसर्गिक फुलांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना व जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा उत्सव असला तरी तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे हीदेखील सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणात सजावट, धार्मिक साहित्य आणि फुलांचा वापर केला जातो.

# गणेशोत्सव देखावा स्पर्धेत यंदा गड-किल्ल्यांचाही समावेश

**विसर्जन मिरवणुकीच्या पारितोषिकांत वाढ; मंडळांनी समाजप्रबोधनासह महाराष्ट्र संस्कृतीचे जतन करावे - महापौर ज्योतीताई गाडे**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच विविध देखाव्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन व्हावे आणि मंडळांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात येत आहे. या स्पर्धेच्या नियोजनासाठी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा समितीची बैठक संपन्न झाली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारस्कर, रोहन सानप, समिती सदस्य, ज्येष्ठ सिनेमा अभिनेते श्रेणिक शिंगवी, गड-किल्ले अभ्यासक अभिजीत दरेकर, आर्किटेक्ट व चित्रकार अजय अपूर्वा, प्रसिद्धी विभाग व सांस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा अधिकारी फिलिप्स, लेखा निरीक्षक गणेश लईचट्टी आदींसह समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, यावर्षीपासून ऐतिहासिक देखावे या विषयामध्ये गड-किल्ल्यांच्या देखाव्याचा समावेश करण्यात यावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा समाजासमोर येण्यास यामुळे मदत होईल.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन करण्याचे काम करावे. विविध देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश आणि जनजागृती निर्माण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

गणेश विसर्जन मिरवणूक मराठमोळ्या पद्धतीने, आपल्या संस्कृतीचे जतन करणारी, समाजप्रबोधनपर, शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने काढणाऱ्या मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदा पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे.

* प्रथम पारितोषिक : १५ हजारांवरून २५ हजार रुपये * द्वितीय पारितोषिक : १० हजारांवरून १५ हजार रुपये * तृतीय पारितोषिक : ७ हजारांवरून १० हजार रुपये अशी वाढ करण्यात आल्याची माहिती महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिली.

सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेतील समाजप्रबोधन देखावा या विषयामध्ये स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलन, पाणीबचत आदी विषयांवरील देखावे सादर करता येणार आहेत. तसेच व्यसनमुक्ती, प्लास्टिकमुक्ती, बेटी बचाव-बेटी पढाव, बालविवाह प्रतिबंध, जागतिक महामारी आदी विषयांवर जनजागृती करणाऱ्या देखाव्यांचाही स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे.

या प्रकारातील उत्कृष्ट देखाव्यांना - प्रथम क्रमांक : २५ हजार रुपये द्वितीय क्रमांक : १५ हजार रुपये तृतीय क्रमांक : १० हजार रुपये अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ऐतिहासिक देखावा या प्रकारामध्ये यंदापासून गड-किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, या प्रकारातही प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.



अहिल्यानगर जिल्ह्यातील हिंद सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधिज्ञ अँड अनंत फडणीस यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना अँड विक्रम वाडेकर (विश्वस्त मोहटादेवी देवस्थान),अँड पंकज खराडे,अँड अक्षय खाडे, अँड यश पंदाडे,अँड सागर वाव्हळ, अँड देवदत्त शहाणे,अँड सुधांशु देशपांडे,अँड अंश दरांगे.

## केडगावात साई सच्चरित्र पारायणास भक्तिमय वातावरणात प्रारंभ

**३१ ऑगस्टला साईबाबांच्या पालखी-पादुकांच्या मिरवणुकीचे आयोजन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर-** केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा शुभारंभ सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी राजू सातपुते यांच्या हस्ते श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे विधिवत पूजन करून भक्तिमय वातावरणात करण्यात आला. यावेळी श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण वाचन श्रीनिवास सहदेव, राहुरी यांच्या वाणीतून होणार आहे. पारायणाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मोठ्या संख्येने साईभक्त पारायणात सहभागी होत आहेत.

श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये काकड आरती, दुग्धाभिषेक, महापूजा यांसह विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिनानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दि. ३१ ऑगस्ट रोजी श्री साईबाबांच्या पालखी व पादुकांची भव्य मिरवणूक शाहूनगर तसेच संपूर्ण केडगाव परिसरातून काढण्यात येणार आहे. साईनामाच्या जयघोषात निघणाऱ्या या मिरवणुकीत मोठ्या संख्येने साईभक्त सहभागी होणार आहेत. तसेच १ सप्टेंबर रोजी श्री साई कथाकार सौ. माधुरीताई शिंदे (शिर्डी) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी विविध मान्यवरांच्या हस्ते मध्यान्ह आरती करण्यात येणार आहे.यावेळी महाप्रसादचे आयोजनही करण्यात आले.

या सर्व धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचा लाभ केडगाव परिसरासह नगर शहरातील सर्व साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन श्री साईबाबा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांची कारवाई; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण-** दादेगाव-चांगतपुरी फाटा परिसरात अवैधरित्या वाळूचे उत्खनन करून चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पैठण पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ट्रॅक्टर-ट्रॉलीसह सुमारे एक ब्रास वाळू असा एकूण ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सचिन बाळासाहेब सोलाट (वय ३५, रा. दादेगाव, ता. पैठण) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री सुमारे १२.५१ वाजता दादेगाव-चांगतपुरी फाटा येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी हा एमएच २० एफयू ८४६९ क्रमांकाच्या स्वराज कंपनीच्या ट्रॅक्टरला लाल रंगाची ट्रॉली जोडून त्यामध्ये अवैधरित्या वाळूची वाहतूक करीत होता. पोलिसांना पाहताच आरोपीने ट्रॉलीतील वाळू खाली करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ट्रॅक्टर-ट्रॉलीसह तो पोलिसांच्या ताब्यात मिळून आला.

कारवाईदरम्यान पोलिसांनी सुमारे ३ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर-ट्रॉली आणि ५ हजार रुपये किमतीची अंदाजे एक ब्रास वाळू असा एकूण ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी अनिरुद्ध पवार यांच्या फिर्यादीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच गौण खनिज कायद्यातील कलम २१ (१), (२), (३), (४), (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध यापूर्वीही पैठण पोलीस ठाण्यात अवैध वाळू प्रकरणी गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोहेका ६८३ जाधव यांनी केली असून पुढील तपास पोहेका १०६९ पुरी करीत आहेत.

# बालघरातील चिमुकल्यांना हॉटेलमध्ये स्नेहभोजन; शैक्षणिक साहित्याचीही भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** बालघरातील मुलांना त्यांच्या नेहमीच्या निवासाच्या वातावरणापेक्षा वेगळे ठिकाण पाहता यावे, त्यांना काही काळ आनंदाचे क्षण अनुभवता यावेत आणि इतर मुलांप्रमाणे हॉटेलमध्ये भोजनाचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशन, कृष्णाली फाऊंडेशन आणि हॉटेल शिंदेशाही यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. पाइपलाइन रोडवरील हॉटेल शिंदेशाही येथे बालघरातील मुलांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुलांना शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले. मुलांना केवळ आवश्यक वस्तू देण्याऐवजी त्यांच्या रोजच्या वातावरणातून काही काळ बाहेर आणून त्यांना नवीन ठिकाणाचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये बालघरात जाऊन मुलांना साहित्य किंवा अन्य मदत दिली जाते. मात्र, या उपक्रमात मुलांनाच बालघरातून बाहेर आणून हॉटेलमध्ये भोजनाची व्यवस्था करण्यात आली. हॉटेलमध्ये प्रवेश केल्यापासूनच मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. वेगळे ठिकाण पाहण्याची उत्सुकता आणि एकत्र भोजन करण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

मुलांसोबत एकत्र भोजन करताना त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. त्यांच्या आवडी-निवडी जाणून घेण्यात आल्या तसेच त्यांच्यासोबत काही काळ आपुलकीने वेळ घालविण्यात आला. मुलांना वस्तूंची मदत देण्यासोबतच त्यांना वेळ, आपुलकी आणि आनंदाचे क्षण देणेही महत्त्वाचे आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. स्नेहभोजनासोबत मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य



उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लागावा, या उद्देशाने ही मदत देण्यात आली. साहित्य मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद उपस्थितांसाठी समाधानाचा क्षण ठरला. बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी या उपक्रमाबद्दल कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशन, कृष्णाली फाऊंडेशन, हॉटेल शिंदेशाही तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व उद्योजक, मान्यवर आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. मुलांना त्यांच्या नेहमीच्या वातावरणापेक्षा वेगळ्या ठिकाणी नेऊन नवीन अनुभव देण्याची ही संकल्पना संवेदनशील आणि कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. ''मुलांसाठी केलेली मदत महत्त्वाची आहेच; मात्र त्यांच्यासोबत वेळ घालवणे, त्यांना आपुलकी देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे ही त्याहून मोठी गोष्ट आहे. मुलांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणाबाहेर आणून वेगळा अनुभव देण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे,'' अशी भावना युवराज गुंड यांनी व्यक्त केली.

या उपक्रमास ज्ञानदेव अकोलकर, प्रीतम दौलतराव शिंदे, आबासाहेब सोनवणे, संजय शिंदे, लता आजबे, प्रियंका चेमटे, सनी डेरंगे, प्रिषिता चेमटे, युवराज गुंड, पत्रकार प्रसाद शिंदे, स्वामी गोसावी आणि मोसिन शेख यांची उपस्थिती व सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशनचे संचालक व अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, हॉटेल शिंदेशाहीचे उद्योजक सुनील शिंदे, . . चे उद्योजक प्रीतम दौलतराव शिंदे तसेच श्री ट्रॅव्हल्स, अहिल्यानगरचे उद्योजक शिवाजी उबाळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटीलच्या विद्यार्थ्यांच्या हातून तयार झालेल्या राख्या थेट सरहद्दीवर तैनात जवानांकडे!

**'दिल से सरहद तक' उपक्रमातून रक्षाबंधनाची अनोखी भेट; राखी बनवा कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** रक्षाबंधनाचा आनंद, गोडवा आणि स्नेह सरहद्दीवर तैनात असलेल्या भारतीय जवानांना देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या आकर्षक राख्या सरहद्दीवर देशाचे रक्षण करणाऱ्या भारतीय जवानांना पाठविल्या आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या 'राखी बनवा कार्यशाळे'त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

अहिल्यानगर लायन्स क्लब, लिओ क्लब आणि घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने 'दिल से सरहद तक' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रेमाने आणि आपुलकीने तयार केलेल्या राख्या भारतीय जवानांपर्यंत पोहोचविण्यासाठी पोस्टाने पाठविण्यात आल्या. आपल्या कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांना रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या हाताने तयार केलेली राखी मिळावी, या भावनेतून विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.





राखी बनवा कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे दोरे, मणी, झिरमिळ्या, रंगीत कागद, फेटी तसेच विविध कलात्मक साहित्याचा वापर करून अत्यंत सुंदर, आकर्षक आणि कल्पक राख्या तयार केल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पनेनुसार राखी तयार करताना त्यामागील भावनाही जपल्या. ही राखी आपल्या भावाला बांधण्यासाठी नसून देशाच्या रक्षणासाठी सीमेवर खंबीरपणे उभ्या असलेल्या जवानांसाठी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. त्यामुळे राखी तयार करताना विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले.

'आपण सुरक्षित आहोत, कारण जवान सीमेवर जागता पहारा देत आहेत' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या छोट्याशा कृतीतून जवानांप्रती असलेला सन्मान, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त झाली. या कार्यशाळेचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी केवळ राख्या तयार केल्या नाहीत, तर भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधनाचे महत्त्वही समजून घेतले. रक्षाबंधनातील 'रक्षा' आणि 'बंध' या दोन शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अनुभवला. एकीकडे भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम आणि संरक्षणाची भावना, तर दुसरीकडे देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानांप्रती असलेला सन्मान, अशी या उपक्रमाची भावनिक सांगड घालण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच भारतीय सण, परंपरा आणि संस्कृतीची ओळख करून देणे, तसेच विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीची भावना दृढ करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या राख्या भारतीय जवानांना पाठविणे हा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. आपल्या कुटुंबापासून दूर राहून ऊन, वारा, पाऊस आणि कठीण परिस्थितीत देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाली. विद्यार्थ्यांनी तयार केलेली प्रत्येक राखी ही केवळ सजावटीची वस्तू नसून त्यामध्ये जवानांप्रती प्रेम, आदर, कृतज्ञता आणि 'देश तुमच्यासोबत आहे' हा भावनिक संदेश सामावलेला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत सहभागी झालेल्या मुला-मुलींनी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने आपल्या हातांनी राख्या तयार केल्या. विविध रंगसंगती, मणी, झिरमिळ्या आणि कलात्मक साहित्याचा वापर करत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा सुंदर आविष्कार घडविला. विशेष म्हणजे तयार केलेल्या राख्या सरहद्दीवर तैनात असलेल्या जवानांना पाठविण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या आनंदाला देशभक्तीची भावनिक जोड मिळाली.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद

## न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन | राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचाही सहभाग; तरुणांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना मिळणार व्यासपीठ



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** 'माय भारत' आणि राष्ट्रीय सेवा योजना () यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २७ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर (स्वायत्त) आणि संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर (स्वायत्त) या दोन निवडक महाविद्यालयांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात संबंधित महाविद्यालयांतील विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक आणि तरुणांसह राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी होणार आहेत. पंतप्रधानांशी आभासी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार असून, खेळ, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आरोग्यदायी जीवनशैली आणि सक्रिय सहभागाचे महत्त्व याबाबत तरुणांना मार्गदर्शन मिळणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडूंच्या अनुभवातून प्रेरणा घेता येणार आहे. क्रीडा क्षेत्रातील समर्पण, शिस्त, चिकाटी, तंदुरुस्ती आणि उत्कृष्टतेचे महत्त्वही त्यांना समजून घेता येणार आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या स्वयंसेवकांना तरुणांमध्ये खेळ, तंदुरुस्ती आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. यामध्ये नाविन्यपूर्ण क्रीडा उपक्रम, सामुदायिक तंदुरुस्ती कार्यक्रम, जनजागृती मोहिमा, सर्वसमावेशक क्रीडा उपक्रम तसेच तरुणांच्या नेतृत्वाखाली राबविता येणारे विविध तंदुरुस्ती उपक्रम यांचा समावेश असू शकतो.

प्राप्त झालेल्या सर्वोत्तम व नाविन्यपूर्ण कल्पनांची निवड करून राष्ट्रीय स्तरावर त्यांचा विचार व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे तरुणांना केवळ राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याची नव्हे, तर देशातील क्रीडा व तंदुरुस्ती चळवळीला बळकटी देण्यासाठी आपल्या कल्पनांचे योगदान देण्याची संधी मिळणार आहे.

भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अहिल्यानगर जिल्ह्यातील सदर दोन्ही महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती होण्यास मदत होणार आहे.

# श्रीगोंद्यात 'आधारशिला व नवचेतना' मेळावा उत्साहात

## चिमुकल्यांच्या हस्ते उद्घाटन; कणसेवाडी अंगणवाडी केंद्राची 'डेमो अंगणवाडी'साठी निवड

**दैनिक आकर्षण | केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील कणसेवाडी अंगणवाडी केंद्र (बीट काष्टी–३) येथे शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ रोजी 'आधारशिला व नवचेतना' वेलकम मेळावा उत्साहात पार पडला. बालकांचा शारीरिक, भाषिक, सामाजिक, भावनिक व बौद्धिक विकास साधण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. विशेष म्हणजे, संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यातील पहिल्या 'डेमो अंगणवाडी'साठी कणसेवाडी अंगणवाडी केंद्राची निवड करण्यात आली आहे.

मेळाव्याचे उद्घाटन श्रीगोंदा विभागाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी () सौ. मीरा नामदेव खेतमाळीस, काष्टी नं. ३ बीटच्या सुपरवायझर श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे, बालसखी सौ. पूजा प्रताप पवार तसेच अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कणसेवाडीचे सरपंच श्री. कुंडलिकराव सुखदेव चिखलठाणे, उपसरपंच सौ. सविता संतोष गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी सौ. दीपा गंगाधर गायकवाड, अंगणवाडी सेविका सौ. शुभांगी गणेश गुंजाळ, मदतनीस सौ. पूनम युवराज ढगे यांच्यासह काष्टी–३ बीटमधील अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विविध स्टॉल्सद्वारे मार्गदर्शन मेळाव्यात ० ते ३ तसेच ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी विविध माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले. बालकांचा सर्वांगीण विकास हसत–खेळत कसा साधता येईल, पोषक आहाराचे महत्त्व आणि वेळेवर लसीकरण याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या बौद्धिक व शारीरिक विकासासाठी विविध नावीन्यपूर्ण खेळांचेही आयोजन करण्यात आले होते.

'माता गट' आणि लोकसहभागावर भर अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती स्वप्नाली ढवळे यांनी कणसेवाडीत विशेष 'माता गट' स्थापन करून विविध उपक्रमांना सुरुवात केली आहे. पालक, अंगणवाडी, समुदाय आणि शाळा यांच्यात समन्वय निर्माण करून बालकांच्या विकासाला चालना देण्यावर या उपक्रमातून भर देण्यात येत आहे. मेळाव्याचे उत्कृष्ट नियोजन सुपरवायझर श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे, अंगणवाडी सेविका सौ. शुभांगी गणेश गुंजाळ व मदतनीस सौ. पूनम युवराज ढगे यांच्या अथक प्रयत्नांतून तसेच ग्रामस्थांच्या लोकसहभागातून करण्यात आले.

अंगणवाडीचे महत्त्व अधोरेखित ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या शारीरिक, भाषिक, बौद्धिक व सामाजिक विकासासाठी अंगणवाडी ही अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. बालके, गरोदर व स्तनदा मातांना पूरक पोषण आहार देणे, आरोग्य तपासणी, वजन–उंचीची नोंद, लसीकरणाचे नियोजन तसेच 'खेळातून शिक्षण' या पद्धतीने पूर्वप्राथमिक शिक्षणाची तयारी करून देणे, अशी विविध कामे अंगणवाडी केंद्रांमार्फत केली जातात. कणसेवाडी येथील 'आधारशिला व नवचेतना' मेळाव्यामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच पालक व ग्रामस्थांमध्ये अंगणवाडीच्या कार्याबाबत जनजागृती निर्माण झाली.

# समर्पण चातुर्मासात शुक्रवारी रक्षाबंधन कार्यक्रम

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** बहिण भावाच्या पवित्र नात्याची वीण घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण नारळी पौर्णिमेला शुक्रवार दि. २८ ऑगस्ट रोजी साजरा होत आहे. आनंदधाम परिसरात सुरू असलेल्या उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मास २०२६ मध्येही शुक्रवारी सकाळी ८.४५ ते ११ यावेळेत रक्षाबंधन साजरे केले जाणार आहे. यानिमित्त विविध स्पर्धा आणि लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा. पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात आनंद तीर्थ समवशरण येथे कार्यक्रम होईल. समर्पण चातुर्मास २०२६ चे मुख्य लाभार्थी सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. कार्यक्रमानंतर बोरा परिवारातर्फे सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

शुक्रवारी सकाळी ८.४५ ते ११ यावेळेत रक्षाबंधन कार्यक्रम होणार आहे. रक्षा बंधनाचे पवित्र अनुष्ठान यावर्षी एकत्रच नारळी पौर्णिमेला करायचे आहे. या कार्यक्रमानिमित्त बेस्ट थाली, बेस्ट राखी, बेस्ट मेहंदी, बेस्ट भाई बहन जोडी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक बक्षीस दिले जाईल. याशिवाय लकी ड्रॉ द्वारे ११ भाग्यवान विजेत्यांना चांदीची राखी भेट दिली जाईल. तसेच उपस्थित सर्व महिलांना विशेष सन्मान उपहार देण्यात येईल.

या पावन पर्युषण पर्वातील रक्षाबंधन कार्यक्रमास श्रावक श्राविकांनी सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्य, सौरभ बोरा मित्र परिवाराने केले आहे.

# अहिल्यानगर सायबर वॉरियर्सकडून सायबर जनजागृतीसाठी व्यापक उपक्रम

## पथनाट्यातून ऑनलाइन फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत नागरिकांना मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' अभियानांतर्गत अहमदनगर सायबर वॉरियर्सच्या वतीने शहरातील नागरिकांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाइन आर्थिक फसवणूक आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत जनजागृती करण्यासाठी व्यापक जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. न्यू चर्च रोड, माणिक चौक रोड, नालेगाव, अहिल्यानगर येथे झालेल्या या उपक्रमातून नागरिकांना दैनंदिन डिजिटल व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.

या उपक्रमाला प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, चेअरमन, प्रिन्सिपल डॉ. आर. जे. बार्नबस, सेक्रेटरी विशाल बार्नबस यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच रेव्ह. डॉ. सनी मिसाळ, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी श्री. गायकवाड आणि नगरसेवक दत्ता कवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षिका समन्वयक निवेदिता काळे मॅडम यांचेही विशेष सहकार्य लाभले.

आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन बँकिंग आणि विविध डिजिटल सुविधांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्याचबरोबर सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा वापर केला जात आहे.



अशा परिस्थितीत नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना जागरूक आणि सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन अहमदनगर सायबर वॉरियर्सच्या वतीने नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी अहमदनगर सायबर वॉरियर्सच्या सदस्यांनी सायबर सुरक्षेवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर केले. पथनाट्यातून नागरिकांना सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध क्लृप्त्यांची माहिती देण्यात आली. बनावट दूरध्वनी करून बँक अधिकारी किंवा अन्य शासकीय अधिकारी असल्याचे भासवणे, खात्याची माहिती मागणे, बक्षीस किंवा नोकरीचे आमिष दाखवणे, बनावट संदेश पाठवून संकेतस्थळाची लिंक उघडण्यास भाग पाडणे, क्यूआर संकेतांकाच्या माध्यमातून फसवणूक करणे, युपीआय व्यवहाराच्या नावाखाली पैसे लुबाडणे अशा विविध प्रकारांबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले.

एकवेळ वापरला जाणारा संकेतांक (ओटीपी), वैयक्तिक ओळख क्रमांक (पिन), संकेतशब्द, बँक खात्याची माहिती, एटीएम किंवा डेबिट कार्डची माहिती तसेच अन्य गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीस देऊ नये, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. बँक किंवा कोणतीही अधिकृत संस्था दूरध्वनीवरून गोपनीय माहिती मागत नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या दूरध्वनीला बळी पडू नये, असेही सांगण्यात आले.

क्यूआर संकेतांकाच्या माध्यमातून पैसे मिळवण्यासाठी क्यूआर संकेतांक स्कॅन करण्याची गरज नसते, याबाबतही नागरिकांना माहिती देण्यात आली.

# पैठण शहरात ईद–ए–मिलादनिमित्त जुलूस उत्साहात व शांततेत

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरात ईद–ए–मिलादनिमित्त भव्य जुलूस मोठ्या उत्साहात आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडला. जुलूसमध्ये माजी आजी नगर सेवक यांच्यासह मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शहरातील प्रमुख सादात द र्गा मार्गांवरून निघालेल्या या जुलूस भाजी मार्केट नेहरू चौक व हथाई वार्ड येथे दुआ करण्यात आली या जुलूस मुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.




जुलूसदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पैठण पोलिस निरीक्षक महादेव गोमारे च्या वतीने कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या नियोजनामुळे जुलूस शांततेत आणि सुरळीतपणे पार पडला.दुआ झाल्यावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच रक्त दान करण्यात आले व अल्तमश फंक्शन हॉल चे उद्घाटन खासदार संदीपान पाटील सुमारे व विलास बापू भुमरे यांच्या हस्ते झाले.

# जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या शोभायात्रेने शहर दुमदुमले

## फुलांनी सजवलेल्या रथात भगवान जिव्हेश्वरांची मूर्ती; हिंदवी शौर्य ढोल पथक ठरले आकर्षण

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने अहिल्यानगर शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या मिरवणुकीत अग्रभागी आकर्षक फुलांची सजावट केलेल्या रथामध्ये भगवान श्री जिव्हेश्वर यांची सुंदर व आकर्षक मूर्ती ठेवण्यात आली होती. या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण हिंदवी शौर्य पारंपरिक ढोल पथक हे ठरले. या ढोल पथकामध्ये ढोल–ताशा वाजविणारी मुले–मुली,तसेच शंखनाद व भगवे ध्वज हे या मिरवणुकीचे वैशिष्ट्य ठरले. ढोल पथकाच्या तालबद्ध आवाजाने संपूर्ण नगर शहर दुमदुमून गेले.

मिरवणुकीचा मार्ग बागड पट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथून प्रारंभ,नेता सुभाष चौक ,चितळे रोड ,चौपाटी कारंजा, दिल्लीगेट, तोफखाना नवरंग व्यायाम शाळा, शितळादेवी, बागडपट्टी येथे मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

या मिरवणुकीत मान्यवरांची उपस्थिती महापौर ज्योतीताई गाडे, माजी उपमहापौर दिपक सुळ, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर,संतोष गेनाप्पा,पै. श्रीकांत छिंदम यांनी शोभायात्रेत आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच या मिरवणुकीत जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण डफळ,अभिजित अष्टेकर,किशोर विंचुरकर, प्रशांत भंडारे, प्रसाद कांबळे, योगेश पांढरपोटे, ओंकार दळवी, गणेश दळवी, संजय जठार,श्रावण सदाफुले,प्रदीप दळवी, राकेश गवते, धनेश्वर पाठक, वैभव जठार,सुमित ढोकळे, रोहन आकडे, चेतन कांबळे,प्रशांत भंडारे आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

# 'विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणेशमूर्तींचीच घरी स्थापना करा' – महापौर ज्योतीताई गाडे

भक्ती व श्रद्धेने तयार केलेल्या गणेशमूर्तींची पारंपरिक पद्धतीने घरी स्थापना करावी. स्वच्छ, सुंदर व हरित अहिल्यानगर बनविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्याचे काम होणार आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व समाजाला पटवून देण्याबरोबरच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम व हानी याची माहिती विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना मिळेल. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे पर्यावरणाच्या दृष्टीने अनेक फायदे असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, अहिल्यानगर शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा मोठ्या प्रमाणात वापर करावा, जेणेकरून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पर्याय उपलब्ध होईल आणि त्यामुळे होणारे जलप्रदूषण टाळता येईल.

नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची सकारात्मक भावना निर्माण व्हावी, यासाठी यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याचा संदेश विद्यार्थ्यांच्या माध्यमातून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बनविलेला शाडू मातीचा गणपती घरी घेऊन जाऊन १४ सप्टेंबर रोजी भक्तिभावाने त्याची स्थापना करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावर्षी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. शाडू मातीपासून उत्कृष्ट गणेशमूर्ती बनविणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने प्रत्येकी एक हजार रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रेसिडेन्सी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्री गणेशाच्या विविध रूपांतील मूर्ती साकारल्या असून, या उपक्रमामुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

प्राचार्य विजय जाधव म्हणाले की, आपल्या उत्सवामुळे आनंद मिळत असला तरी त्यातून पर्यावरणाला कोणतीही हानी होऊ नये, यासाठी प्रत्येकाने आपल्या घरी शाडू मातीच्या गणपतीची स्थापना करावी. गणपतीची मूर्ती तयार करणे ही केवळ जबाबदारी नसून पर्यावरणाचे संवर्धन करण्याचा एक मार्ग आहे. पर्यावरणावर काम करणे ही केवळ महापालिकेची एकट्याची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे यावर्षी प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव मोठ्या धार्मिक व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर यांनी पर्यावरण संवर्धनाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेत रेसिडेन्सी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अत्यंत मनोभावे शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविल्या. गणेशाच्या विविध रूपांना विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने आकार दिला. विद्यार्थ्यांच्या या कलाकृतींमधून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यात आला.

विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीही कार्यशाळेत सहभाग घेत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना आणि पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीबाबत जनजागृतीपर कला सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय म्हस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन वैशाली मरकड यांनी मानले.

### एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी करत आ. रोहित पवार आक्रमक

''शेतकऱ्यांची मुले–मुली अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, कर्ज आणि उसने पैसे काढून पुण्यात अभ्यासासाठी येतात. मात्र, जलसंपदा, राज्य उत्पादन शुल्क, तलाठी भरती, आणि यांसारख्या अनेक परीक्षांचे पेपर सतत फुटत आहेत. आधी चा पेपर फुटलाच नाही असा दावा केला जात होता; मात्र आता पुरावे समोर आल्यावर परीक्षा रद्द करावी लागली आहे.

या पेपरफुटीत ३ बड्या अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा दावा करत, ऑनलाइनऐवजी ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घेण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. येत्या १ तारखेपर्यंत एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिवांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा न दिल्यास आयोगाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.

अध्यक्षांना घरी पाठवा, अन्यथा
१ तारखेला आयोगावर धडक!

''मी जेव्हा बोलतो तेव्हा पुराव्यांसह बोलतो. आम्ही आवाज उठवला की आम्हाला जेलमध्ये टाकण्याची धमकी दिली जाते. एमपीएससीचे अध्यक्ष एका मोठ्या नेत्याचे मित्र आहेत; मध्ये असताना त्यांनी काय काय गोंधळ घातलाय, याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात आहे. अशा अधिकाऱ्यांना एमपीएससीच्या अध्यक्षपदी बसवणे आम्हाला मुळीच मान्य नाही. अध्यक्ष आणि सचिवांनी तात्काळ राजीनामा द्यावा किंवा सरकारने त्यांना घरी पाठवावे. स्वच्छ प्रतिमा असलेल्या अधिकाऱ्याकडे एमपीएससीची सूत्रे सोपवावीत. १ तारखेपर्यंत राजीनामा दिला नाही, तर आम्ही थेट आयोगाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करून जाब विचारू!''
आमदार रोहित पवार